दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक १७५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.१९ सप्टेंबर २०२० • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

करोडो रुपयांच्या ड्रग्जसह सापडला पेडलर ; बॉलिवूड कनेक्शनबाबत भांडाफोड होणार

दै.रायगड नगरी । मुंबई

सुशांत सिंग राजपूत मृत्यू प्रकरणातील रियाच्या ड्रग्ज कनेक्शनमध्ये एनसीबीला (नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो) मोठे यश मिळाले आहे. एनसीबीने बॉलिवूडमध्ये ड्रग्स पुरवठा करणार्या मोठ्या ड्रग पेडलरला पकडले आहे. राहिल विश्राम असे या आरोपीचे नाव आहे.

सूत्रांकडून अशी बातमी समोर आली आहे की, राहिलचा बॉलिवूड सेलिब्रिटीशी थेट संबंध आहे. काल दुपारपासून आज पहाटेपर्यंत एनसीबीने छापेमारी करून रहिलला पकडले. राहिलकडून एनसीबीने जवळपास ३ ते ४ कोटीचे ड्रग्ज जप्त केले आहेत. तसेच साडेचार लाखांची रोकडही हस्तगत केली आहे. सुरुवातीच्या चौकशीत राहिल म्हणाला की, तो बॉलीवूडमध्ये ड्रग्स पुरवठा करण्याच्या मोठ्या नेटवर्कचा एक भाग आहे. राहिलने एनसीबीला ज्याच्यासाठी तो काम करत असे त्याविषयी माहिती दिली आहे. आता एनसीबी या ड्रग्जच्या साखळीचा मुख्य आरोपी शोधत आहे.

कृषीविषय विधेयकांविरोधात काँग्रेस देशव्यापी आंदोलन छेडणार

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

कृषीविषयक विधेयकांविरोधात विरोधी पक्षांकडून निषेध सुरूच आहे. सरकारकडून लोकसभेत गुरुवारी मांडण्यात आलेल्या दोन कृषीविषय विधेयकं शेतकरीविरोधी असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केलाय. आता संसदेपासून ते रस्त्यापर्यंत या विधेयकांविरुद्ध काँग्रेस पक्षाने आवाज उठवला आहे. कृषीविषयक विधेयकं आणि अध्यादेशांविरोधात काँग्रेस देशभरात निदर्शनं करणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

कृषीविषयक विधेयकाविरोधात विरोधी पक्षांना एकत्र करण्यासाठी काँग्रेस समविचारी पक्षांशी चर्चा करत आहे. कृषीविषयक विधेयकास एकत्रितपणे विरोध केला पाहिजे. रस्त्यावर उतरण्यापासून ते ते सोशल मीडियामधून निषेध अधिक तीव्र करण्याची तयारी काँग्रेस पक्ष करत आहे. जे पक्ष कृषी विधेयकाला विरोध करत आहेत, त्यांना काँग्रेसने सोबत येण्याचं आवाहन केलं आहे.

कृषी संबंधित दोन विधेयकांवरून वाद सुरू आहे. उत्तर प्रदेश, पंजाब आणि हरयाणामध्ये शेतकरी रस्त्यावर उतरले असून केंद्रातील मोदी सरकारचा निषेध करत आहेत. पण विरोध होऊनही मोदी सरकार माघार घ्यायला तयार नाही. लोकसभेत ही दोन विधेयकं मंजूर झाली आहेत. शेतकऱ्यांची मोठी संघटना 'किसान भारतीय युनियन' ही कृषी विधेयकांविरोधात उतरली असून शेतकरी आपल्या मार्गाने आंदोलन करतील, असं संघटनेचे अध्यक्ष राकेश टिकैत यांनी सांगितलं.

तर सरकारच्या कृषीविषयक विधेयकांमुळे कॉर्पोरेट क्षेत्राकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होईल. यामुळे केंद्र सरकारच्या विधेयकाविरोधात सर्वांनी एकजुटीने आंदोलनात उतरावं. येत्या २४ सप्टेंबर ते २६ सप्टेंबरपर्यंत रेलरोको आंदोलन केलं जाईल, असा इशारा पंजाबमधील किसान मजदूर संघर्ष समितीने दिला आहे.

राहुल गांधी यांनी आधीपासूनच कृषीविषय विधेयकावरून सरकार विरोधात भूमिका घेतली आहे. मोदींनी शेतकऱ्यांना उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते. पण मोदी सरकारचे 'काळे' कायदे शेतकरी आणि शेतमजुरांचे आर्थिक शोषण करण्यासाठी केले जात आहेत. हे 'जमीनदारी' चे एक नवीन रूप आहे आणि मोदीजींचे काही 'मित्र' नव्या भारताचे 'जमीनदार' असतील. कृषी बाजार हटवला तर देशाची अन्न सुरक्षा मिटेल', असा इशारा राहुल गांधी यांनी ट्विट करून दिलाय.

चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या ९० व्या हुतात्मा स्मृतीदिनावर कोरोनाचे सावट...

पोलिसांतर्फे बंदुकीच्या फैरी झाडून शासकीय मानवंदना

दै.रायगड नगरी । जीवन केणी

उरण : देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात २५ सप्टेंबर १९३० साली आक्कादेवीच्या माळरानावर झालेल्या ऐतिहासिक चिरनेर जंगल सत्याग्रहाचा ९० वा स्मृती दिनाचा कार्यक्रम कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अडचणीत आला आहे. दरवर्षी या दिवशी चिरनेर येथे हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्याच्या शासकीय इतमानाने साजरा करण्यात येणारा कार्यक्रम कोरोनाच्या सावटाखाली आला आहे.

देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात सविनय कायदेभंग आंदोलना अंतर्गत देशभरात आंदोलने सुरु होती. इंग्रज भारत छोडोचा नारा देत देशभरात आंदोलनाचा भडका उडाला होता. त्याच वेळी चिरनेर येथेही २५ सप्टेंबर १९३० साली जंगल सत्याग्रह आंदोलन सुरु करण्यात आले होते.शांततामय रितीने सुरु असलेल्या जंगल सत्याग्रहात शेतकरी, आगरी, आदिवासी असे सुमारे दोन हजार आंदोलक सहभागी झाले होते.

यामध्ये २० ते २२ वयोगटातील युवकांचाच अधिक भरणा होता. जंगल का कायदा तोड दिया, इंग्रज भारत छोडोचा नारा देत आक्कादेवीच्या डोंगराकडे निघालेल्या आंदोलन कर्त्यांवर जुलमी

ब्रिटिश पोलिसांनी निर्दयपणे बेछुट केला. या गोळीबारात धाकू गवत्या फोफेरकर, नाग्या महादु कातकरी दोघेही – चिरनेर, आलू बेमट्या म्हात्रे – दिघोडे, आंनदा माया पाटील – धाकटीजुई, रामा बामा कोळी – मोठीजुई, रघुनाथ मोरेश्वर शिंदे (न्हावी) – कोप्रोली, परशुराम रामा पाटील – पाणदिवे व हसुराम बुद्धाजी घरत – खोपटे या उरण तालुक्यातील आठ हुतात्म्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.

तर अनेकजण जखमी झाले.स्वातंत्र्य लढ्यातील चिरनेर जंगल सत्याग्रहाचा हा लढा देशभरात प्रसिध्द आहे. या लढ्यात उरण तालुक्यातील धारातिर्थी पडलेल्या आठ हुतात्म्यांची स्मारके शासनाने परिसरातील त्यांच्या मुळगावी उभारली आहेत. स्वातंत्र्य संग्रामातील या महत्वाच्या लढ्यात बलिदान दिलेल्या हुतात्म्यांचे आणि स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढयाचे सर्वांनाच स्मरण व्हावे आणि हुतात्म्यांच्या स्मृती कायम तेवत राहावी यासाठी दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी चिरनेर येथे हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो.

शासकीय इतमानाने साजराही करण्यात येतो. बंदुकीच्या फैरी झाडून हुतात्म्यांना अभिवादन, मानवंदना दिली जाते. पुष्पचक्र वाहुन हुतात्म्यांचे स्मरण केले जाते. तसेच हुतात्म्यांच्या वारस, कुटुंबातील सदस्यांचा यथोचित सत्कार, सन्मान करण्यात येतो.यावेळी लोकप्रतिनिधी, .../२

पत्रकारांसाठी विमा कवच आणि उपचारार्थ बेड उपलब्ध करून देण्याची मागणी

पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आले निवेदन

दै.रायगड नगरी । पनवेल

नुकतेच रायगड मधील डॅशिंग पत्रकार संतोष पवार यांचे कोरोनामुळे निधन झाले. तत्पूर्वी पुण्यामध्ये पांडुरंग रायकर यांचा कोविड मुळे झालेला मृत्यू जीवाला चटका लावून गेला. या दोन पत्रकार बांधवांसह अन्य बारा पत्रकार बांधवांचा महामारी च्या कालखंडात राज्यात मृत्यू झाला आहे. अन्य पत्रकार बांधवांवर अशी वेळ येऊ नये म्हणून वेळीच सावध होत प्रशासनाकडे पत्रकारांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचे बाबत आज राज्यभरात आंदोलने करण्यात आली. पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीच्या वतीने पनवेलच्या तहसील कार्यालयात नायब तहसीलदार एन डी गांगुर्डे यांना मागणीचे निवेदन देण्यात आले.

संतोष पवार आणि पांडुरंग रायकर हे प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे बळी गेले असल्याचे आरोप होत आहेत. कोरोना महामारी या कालखंडात लोकशाहीचा चौथा स्तंभ प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. असे असले तरी पत्रकार बांधवांना विषाणूची लागण झाल्यास त्यांच्या उपचारार्थ सुविधा नाही किंवा त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्यांना विम्याचे कुठलेही संरक्षण नाही. या दोन मुख्य मागण्यांसाठी राज्यभरातील पत्रकार संघटनांनी विविध ठिकाणी आंदोलन केले. पत्रकारांसाठी शासनाच्या वतीने देण्यात येणार्या विमा संरक्षणाचे बाबत केवळ वेळ काढू पणाचे धोरण सुरू आहे. याबाबत अंतिम मसुदा तात्काळ निर्माण करून पत्रकारांना त्यांच्या विमा संरक्षणाची कागदपत्रे शक्य तितक्या लवकर प्रदान करावेत अशी मागणी जोर धरत आहे. पनवेल महानगरपालिकेने पत्रकारांसाठी काही ठिकाणी बेड राखून ठेवले असले तरीदेखील त्यांची संख्या तुटपुंजी आहे, तसेच पत्रकारांच्या कुटुंबियांना लागण झाल्यास त्याबाबत काय? हे अद्यापही चित्र स्पष्ट नाही. तहसीलदार कार्यालयामध्ये निवेदन देताना संघटनेच्यावतीने अध्यक्ष निलेश सोनावणे, सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार सुनीलदादा पोतदार, सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, कार्याध्यक्ष संजय कदम, सरचिटणीस मंदार दोंदे,अनिल भोळे,अनिल कुरघोडे, प्रविण मोहोकर,भालचंद्र (बाळू) जुमलेदार आदी सदस्य उपस्थित होते.

कोकण रेल्वेची कोलाड रोरो सेवा दीड महिन्यानंतर सुरळीत सुरू

दै.रायगड नगरी । विश्वास निकम

गोवे-कोलाड : दीड महिन्यांपूर्वी प्रचंड मोठया प्रमाणात पडलेल्या पावसामुळे मडगाव ते गोवा दरम्यान पेडणे भोगदयावर मोठ्या प्रमाणात माती आल्याने सुमारे सव्वा ते दीड महिने कोकण रेल्वेची वाहतूक ठप्प झाली होती गणेश उत्सव काळात फक्त सावंतवाडी पर्यंत गाड्या सोडण्यात आल्या होत्या कोकण रेल्वेचे व्यवस्थापकीय संचालक संजय गुप्ता यांनी पाहणी करून १६ सप्टेंबर पासून कोकण रेल्वे पूर्ववत सुरू होईल अशी माहिती दिली नंतर गुरुवार दि.१७ सप्टेंबर २०२० पासुन कोकण रेल्वेची कोलाड रोरो सेवा सुरळीत सुरु करण्यात आली आहे.

कोलाड रेल्वेची रोरो सेवा पेडणे (गोवा)या भोगद्यावर प्रचंड प्रमाणात माती आल्याने बंद करण्यात आली होती. त्याअगोदर भारतदेशासह संपुर्ण जगभरात कोरोना विषाणु वाढता प्रादुर्भाव लक्ष्यात घेता त्याला आळा घालण्यासाठी सर्वत्र लॉक डाऊन करण्यात आला होता. अत्यावश्यक वस्तूंची सेवा ..../२

विद्युत महामंडळाचे खांब चोरणाऱ्या ठेकेदाराला दिघी सागरी पोलिसांनी केली अटक

३ लाख २८ हजारांचे एकूण ८२ विद्युत खांब हस्तगत

दै.रायगड नगरी । बोर्लीपंचतन

बोर्ली पंचतन परिसरातील विद्युत महामंडळाचे ३ लाख २८ हजार रुपये किंमतीचे एकूण ८२ खांब चोरणाऱ्या आरोपींना दिघी सागरी पोलिसांनी अटक केली आहे. विशेष म्हणजे सदरच्या गुन्ह्यातील आरोपी व त्याचे साथीदार हे विद्युत महामंडळाचे ठेकेदार असल्याने याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलिसांनी अवघ्या २४ तासात पूर्ण केला असून एकूण ८२ खांबांपैकी चोरट्यांकडून सर्वच विद्युत खांब हस्तगत करण्यात दिघी सागरी पोलिसांना यश आले आहे.

निसर्ग चक्रीवादळाच्या तडाख्याने रायगडसह श्रीवर्धन तालुक्यात सर्व झाडे विद्युत खांबांवर, डीपी व विजवाहिन्यांवर पडल्याने विद्युत महामंडळाचे मोठे नुकसान झाले होते तसेच विद्युत पुरवठा देखील अनेक दिवस खंडीत झाला होता. त्यामुळे विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी एमएसईबी ने विद्युत खांबांसह ईतर साहित्य अन्य ठिकाणांहून श्रीवर्धन तालुक्यात आणले होते. त्यादरम्यान एमएसईबी ने दिवेआगर मधील श्री.सुवर्ण गणेश मंदिरामोरील पटांगणात एकूण ८२ विद्युत खांब ठेवले होते. या खांबांची उंची साधारण ८ मीटर असून प्रत्येक खांबावर PUSHPAK MB 125 असे ट्रेडमार्क आहे.

सध्या लॉकडाऊन मुळे सुवर्ण गणेश मंदिर बंद असल्याने सभोवतालचा परिसर व समोरील मैदानावर शांतता असून लोकांचीही वर्दळ नसते, याच संधीचा फायदा ..../२

महापौरांनी कोरोनाला बगल देत पालिका मुख्यालय आणि क्रिकेट प्रशिक्षण केंद्रला मंजूरी

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवारी १८ सप्टेंबर रोजी पनवेल महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह आयोजीत करण्यात आली होती. यावेळी सेक्टर ६, नवीन पनवेल येथील भूखंड क्रमांक चार या भूखंडावर पनवेल महानगरपालिकेचे मुख्यालय बांधण्याकरता संकल्पचित्र आणि आराखड्यास मान्यता मिळणेबाबत आणि पनवेल महानगरपालिका हद्दीत नवीन पनवेल, सेक्टर ११ येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र विकसित करून आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्याबाबत विषय मंजूर करण्यात आले. यावेली पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात वाढत असलेल्या कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावावर जवळपास २ ते ३ तास चर्चा करण्यात आली. मात्र कोरोनावर उपाययोजना करण्यासाठी काय करता येतील यावर कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे विरोधी पक्षाने नाराजी व्यक्त केली. यावेली विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे हे कोरोना पोजिटिव्ह असल्याने ते या सभेला ऑनलाइन उपस्थित होते.

सर्वसाधारण सभा कोरोनाच्या काळात झाली. आणि कोरोनाचे प्रमाण पनवेलमध्ये दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे विषय पत्रिकेवर महापौरानी कोरोनाचा विषय घ्यायला हवा होता मात्र महापौरानी कोरोनाचा एकही विषय विषयपत्रिकेवर घेतला नाही त्यामुळे नुसती चर्चा करून काही फायदा नसल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता पालिका मुख्यालय आणि क्रिकेट प्रशिक्षण केंद्र हे विषय स्थगित ठेवण्याचा अट्टहास विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी धरला. कोरोना काळात शेजारील नवी मुबंई महापालिका चांगले काम करतेय मात्र पनवेल पालिका प्रशासन मात्र कोरोनाला गंभीरतेने घेत नसल्याचा आरोप सत्ताधारयानी केला, तसेच नवी मुबंई महापालिकेने ज्या पद्धतीने कोरोना करिता रुग्नालयात उपलब्ध असलेल्या खाटांची माहिती रुग्णांना मिळावी या साठी एक कॉमन संपर्क क्रमांक सर्वसामान्यांसाठी उपलब्ध करून दिला आहे. त्या प्रमाणे एकच संपर्क क्रमांक पनवेल पालिकेने देखील उपलब्ध करून द्यावा अशी मागणी सभागृहासमोर करण्यात आली. पालिका हद्दीतील कोरोना रुग्णांना वेळेत ऑक्सिजन बेड उपलब्ध होत ..../२

आशा लशीची

करोनाच्या रुग्णसंख्येत भारत आज जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतातील एकूण करोनारुग्णांची संख्या ५१ लाखांच्या वर पोहोचली आहे. यातील ४० लाखांपेक्षा अधिक बरे झाले आहेत आणि मृतांचा आकडा या रुग्णसंख्येच्या तुलनेत कमी म्हणजे ८३ हजारांपेक्षा थोडा अधिक आहे. काही दिवसांनी भारत रुग्णसंख्येत अमेरिकेला मागे टाकणार आहे आणि त्यानंतर भारताच्या प्रचंड लोकसंख्येचे गणित पाहता करोनापासून मुक्त होणाऱ्या अगदी शेवटचा देश भारतच असण्याची दाट शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जगभरात करोनाच्या लसींवर होणारे संशोधन आणि त्यातून भारतीयांना मिळू शकणारा दिलासा यावर आशा केंद्रित झाल्या तर नवल नाही. काही आठवड्यांपूर्वी करोनाच्या लसीची चाचणी यशस्वी झाल्याचा दावा रशियाने केला होता. आता रशियाने भारतातील डॉ. रेड्डीज् लॅबोरेटरीच्या साह्याने भारतात लसचाचणी घेण्याचे ठरविले आहे. ही आशा जागविणारी बातमी आहे. काही दिवसांपूर्वी भारतात दुसऱ्या एका प्रयोगशाळेत होणाऱ्या ब्रिटिश लसीच्या चाचणीत काहीशी गुंतागुंत निर्माण झाल्याने या चाचण्या थांबवाव्या लागल्या होत्या. त्याही चाचण्या पुन्हा सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत. या रशियन लसीचे नाव 'स्पुटिनक' आहे आणि डॉ. रेड्डीजने भारतातील प्राथमिक चाचण्यांचे तीन टप्पे यशस्वी केले, तर या रशियन लसीचा पुरवठा या वर्षाच्या अखेरपर्यंत सुरू होऊ शकेल. रशियाने भारताला दहा कोटी डोस पुरविण्याची तयारी ठेवली आहे. या सगळ्या घडामोडींमध्ये काही अनुकूल घटक आहेत. एकतर भारत आणि रशिया यांच्या जुन्या मैत्रीमुळे सरकारी पातळीवरच्या चर्चा वेगाने पुढे सरकतील. नवीन लसी विकसित करण्यातील रशियाचा अनुभव दांडगा आहे आणि डॉ. रेड्डीज् लॅबला रशियामध्ये काम करण्याचा किंवा संयुक्त प्रकल्प राबविण्याचा २५ वर्षांचा दांडगा अनुभव आहे. भारताची १३२ कोटींची लोकसंख्या पाहता दहा कोटी डोस पुरणार नाहीत, हे तर उघडच आहे. याचा अर्थ, हे लसीकरणाचे काम अनेक महिने चालणारे ठरू शकते. या आशादायी घटनांच्या पार्श्वभूमीवर करोना लस तयार होण्याच्या प्रक्रियेत सहभागी असणारे दानशूर उद्योगपती बिल गेट्स तसेच संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक आरोग्य संघटनेच्या मुख्य वैज्ञानिक सौम्या स्वामीनाथन यांनी भारताचा संदर्भ देऊन केलेल्या विश्लेषणाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. हे वर्ष संपण्याच्या आधीच लस तयार होऊ शकेल आणि तशी लस तयार होण्यात व तिचे पुढे मोठ्या प्रमाणात वेगाने उत्पादन करण्यात भारताची भूमिका महत्त्वाची असेल, हे या दोघांनीही स्पष्टपणे सांगितले आहे. जगात सध्या चाललेल्या प्रयोगांपैकी तीन ते सहा प्रयोग यशस्वी होऊन तितक्या लसी उपलब्ध होतील, असे गेट्स यांना वाटते आहे. डिसेंबर आता तसा फार दूर नाही. मात्र, सौम्या स्वामीनाथन यांनी वेगाने लसीकरण करण्यातील अडचणींवर नेमकेच बोट ठेवले आहे. भारतात कोट्यवधी नागरिकांना वेगाने लस टोचावी लागेल. ही लस पोलिओच्या लसीसारखी पोटात घ्यावयाची नसेल. ती टोचावी लागेल. असे लसीकरण वेगाने करण्यासाठी प्रचंड मोठा फौजफाटा तयार ठेवावा किंवा करावा लागेल. खरेतर, ही तयारी आत्तापासूनच करायला हवी. तसेच, लस टोचताना कोणत्या प्रदेश आणि जिल्ह्यांना प्राधान्य द्यावयाचे, याचेही कार्यक्षम नियोजन करण्याची गरज आहे. आज आरोग्य सेवेतील सारे कर्मचारी तसेच डॉक्टर कमालीचे थकून गेले आहेत. अशावेळी, ज्या देशांमधील करोनाची साथ आटोक्यात आली आहे, त्या देशांची मदत कशी घेता येईल, याचाही विचार आत्ताच करायला हवा. सौम्या स्वामीनाथन यांनी भारतीयांच्या मनात दडून बसलेल्या आणखी एका शंकेचा स्पष्ट खुलासा केला आहे. लस आली, याचा अर्थ करोनाचे निर्मूलन झाले, असा कोणी घेऊ नये आणि हा धोका पुरता संपला असे मानू नये, असेही त्यांनी बजावले आहे. हा धोका जर संपणार नसेल तर दीर्घ मुदतीची उपाययोजना काय, यावरही त्यांनी काही भाष्य केले आहे. हा उपाय म्हणजे भारतातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणा, व्यवस्था आणि सेवा मजबूत करणे. ही जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारांची आहे, हे विसरता येणार नाही. करोना आटोक्यात आल्यानंतर तर याचे स्मरण वारंवार करून द्यावे लागेल. भारतात लसचाचण्या यशस्वी होतील आणि भारतीय कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात लसउत्पादन करण्याची क्षमता आहे, असे बिल गेट्स म्हणत असले तरी त्यामागचा लपलेला अर्थ याची सगळ्यांत जास्त गरज भारतातच पडणार आहे, हा आहे. आता करोना जसजसा आटोक्यात येत जाईल, तसतसे साऱ्या जगाचे लक्ष सर्वाधिक नवीन करोनारुग्ण सापडणाऱ्या भारतावर केंद्रित होणार आहे. आज करोनाचे २१ विविध अवतार अस्तित्वात असून ते वाढू शकतात. सुदैवाने, भारतात प्रसार होणारे या विषाणूचे प्रकार हे कमी घातक असल्याचे म्हटले जाते. रुग्ण आणि मृत्यू यांचे गुणोत्तर कमी प्रतिकूल दिसण्याचे तेही एक कारण मानले जाते. उत्तम लसी पुरेशा प्रमाणात मिळाल्या तर इ.स. २०२२ मध्ये करोनाच्या साथीचा मागमूस राहणार नाही, असे त्यांच्या स्वभावाला अनुसरून गेट्स यांनी म्हटले आहे. पण यात उत्तम लसी पुरेशा मिळण्याची जशी पूर्वअट आहे, तसेच कोट्यवधी नागरिकांना कमीत कमी काळात लस टोचण्याचे आव्हानही अनुस्यूत आहे. गेट्स यांनी रेंगाळणाऱ्या आर्थिक विकास आणि गरिबीच्या लढाईचा केलेला उल्लेखही भारताच्या संदर्भातच केला आहे. ती लढाई पुढची आहे. ती सुरू करण्याआधी आरोग्य व्यवस्था कायमची मजबूत करण्यासाठी पावले टाकावी लागतील. याकडे केंद्र किंवा राज्य सरकारचे पुरेसे लक्ष आहे, असे दिसत नाही. मग केवळ लस मिळून कसे भागेल?

माझे कुटुंब,'माझी जबाबदारी' मोहिमेस म्हसळयामध्ये प्रारंभ, सर्वांची होणार तपासणी

दै.रायगड नगरी । उदय कळस

म्हसळा : म्हसळयात माझे कुटुंब,'माझी जबाबदारी' या मोहिमेला सुरवात करण्यात आली.ही मोहीम किमान २५ ऑक्टोबर पर्यंत सुरू राहणार आहे.या मोहिमेद्वारे म्हसळा शहरातील प्रत्येक नागरिकांची आरोग्य तपासणी करून प्रत्येक नागरिकास व्यक्तिशः भेटून आरोग्य शिक्षण देण्यात येणार आहे .

यावेळी तहसिलदार शरद गोसावी यांनी सांगितले की,कोरोनावर नियंत्रण मिळविण्यासाठी जनतेच्या सक्रिय सहभागाची अत्यंत आवश्यकता आहे.महाराष्ट्र कोविड मुक्त करण्यासाठी एकत्र येऊन लढण्याच्या उद्देशाने 'माझे कुटुंब' माझी जबाबदारी' ही मोहीम राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.या मोहिमेंतर्गत विविध ठिकाणी प्रत्येक नागरिकांची आरोग्य तपासणी, गंभीर आजार असल्यास उपचार आणि प्रत्येक नागरिकास व्यक्तिशः भेटून आरोग्य शिक्षण देण्यात येणार आहे.

गेली सात महिने कोरोनाने जगभर थैमान घातले आहे. कोरोनावर उपचारासाठी ठोसपणे अद्याप कोणतीही लस उप-लब्ध झालेली नाही त्यामुळे कोरोना कधी संपेल याची चिन्हे फारच कमी असल्याने महाराष्ट्र शासनाने माझे कुटुंब-माझी जबाबदारी मोहिमेला सुरुवात केली आहे या मोहिमेचा शुभारंभ म्हसळा तहसिल,पंचायत समिती आणि नगर पंचायत यांचे वतीने करण्यात आला.ज्यांच्या हाती जनतेचे आरोग्य सुरक्षित आहे तेच तालुका वैद्यकीय विभागाचे अधिकारी या कार्यक्रमात सहभागी झाले नव्हते.माझे कुटुंब-माझी जबाबदारी मोहिमेत शासनाचे नेमुन दिलेले संबंधीत ५ अधिकारी व कर्मचारी नागरिकांच्या घरोघरी जाऊन ट्रेस,ट्रॅक,ट्रीट या त्रिसूत्रीचा वापर करून कोरोना प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी माहिती व तपासणी करणार आहेत.मुंबई, पुणे,ठाणे इत्यादी शहरात कोरोना आजारांचे रुग्ण संख्या तुलनेने स्थिर होत असली तरी इतर जिल्हे आणि ग्रामीण भागामध्ये कोविड-१९ रुग्ण मोठया प्रमाणात आढळुन येत आहेत या बाबत माहिती देताना अनलॉक प्रक्रिया सुरू असताना,जनजीवन पुर्वपदावर आणण्याबरोबरच कोविड प्रादुर्भावावर नियंत्रण अधिक प्रभावीपणे करण्यासाठी राज्यातील सर्व लोकसंख्येला दोन वेळा घर भेट देऊन आरोग्य, शिक्षण,महत्त्वाचे आरोग्य संदेश, संशयित कोविड रुग्ण शोधणे तसेच मधुमेह,हृदयविकार,किडनी आजार,लठ्ठपणा या सारख्या महत्वाच्या ले-ीलळव लेपवळ-ीळेप असणाऱ्या व्यक्ती शोधुन काढणे,त्याच प्रमाणे बालकांचे लसीकरण, गरोदर मातांवर वेळीच उपचार याचा अंतर्गभाव या मोहिमेत आहे.म्हसळा तालुक्यात माझे कुटुंब,माझी जबाबदारी मोहीम यशस्वी होण्यासाठी आणि त्या बाबत प्रचार व प्रसार करण्यासाठी जि. प.चे कृषी सभापती बबन मनवे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झालेल्या या मोहिमेस तहसीलदार शरद गोसावी,गटविकास अधिकारी वाय.एम.प्रभे,मुख्याधिकारी मनोज उकिर्डे,प.तहसिलदार अनिकेत सोनावणे यांनी न्यु इंग्लिश स्कूल म्हसळा येथे संयुक्तिक वार्तालाप घेऊन मोहिमेचा शुभारंभ करून पत्रकारांना माहिती दिली.या वेळी कार्यक्रमाला राजीप कृषी सभापती बबन मनवे,सभापती उज्वला सावंत,उपसभापती मधुकर गायकर,नगराध्यक्षा जयश्री कापरे,माजी सभापती छाया म्हात्रे,प.स.सदस्य संदीप चाचले,गट शिक्षण अधिकारी संतोष शेटगे,विस्तार अधिकारी गायकवाड,स्कूल चेअरमन समीर बनकर,अनिल बसवत आदी मान्यवर आणि स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.सदरची मोहीम दिनांक १५ -०९-२०२० ते २५-१०-२०२० या कालावधीत दोन टप्प्यात राबवली जाणार आहे.अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी कार्यक्रमात माहिती देताना तपासणी करणारे पथक रोज ५० कुटुंबाला गृहभेटी देतील.या भेटीत तपासणी आणि कोमॉर्बीड,आजारी व्यक्तिंना उपचार आणि आरोग्य शिक्षण याद्वावरे या साथीवर नियंत्रण आणण्यासाठी संपुर्ण राज्यात माझे कुटुंब-माझी जबाबदारी मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

उरण तालुक्यात कोरोनाचे ५ रुग्ण तर एकाच मृत्यू

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यात कोरोनाचे नवे ५ रुग्ण आढळून आले असून, एकाच रुग्णालयात उपचार घेत असतांना मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली आहे.तर १२ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. यामध्ये चिंतामणी सोसायटी सेक्टर - १२ द्रोणागिरी नोड - २, नागाव - १, हरिश्चंद्र पिंपळे , धाकटीजुई - १ व मुळेखंड - १ असे ५ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले आहेत.

तर म्हातवली - १, मंगलमूर्ती अपार्टमेंट चिंतामणी बंगला कुंभारवाडा - १, नागाव - २, करंजा - १, करंजा नवापाडा - १, बोकडविरा - २, द्रोणागिरी -१, जेएनपीटी - १, उरण - १ व देउलवाडी उरण - १असे १२ रुग्ण उपचार घेऊन घरी परतले आहेत. याशिवाय १८२ कोरोनाग्रस्त रुग्ण बोकडविरा व जेएनपीटी येथील कोविड सेंटरमध्ये उपचार घेत असल्याची माहिती तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली आहे.

शिवाजी शिंदे यांच्या प्रयत्नातून गणेश जनार्दन यांना मदतीचा हातभार

दै.रायगड नगरी । माथेरान

सुखात सगळे असतात परंतु दुःखात जो कुणी पुढाकार घेऊन देवासारखा मदतीला धावून जातो तोच खरा सत्वशील आणि दातृत्वांचे संस्कार जोपासलेला सतकर्मी असतो.

नुकताच काही दिवसांपूर्वी येथील गणेश जनार्दन आखाडे यांच्या घोड्याचा विजेचा शॉक लागून अपघाती मृत्यू झाला होता. काही दिवसांवर पर्यटन हंगाम येऊन ठेपलेला असताना अचानकपणे गणेश आखाडे यांच्या व्यवसायावर घाला घातला गेला आहे त्यामुळे काय करावे याच विवंचनेत असताना येथील दानशूर व्यक्तिमत्त्व असलेले नगरपरिषदेतील विरोधीपक्ष नेते शिवाजी शिंदे यांच्या

प्रयत्नातून गणेश जनार्दन आखाडे यांना आर्थिक मदतीचा हातभार लावला आहे. त्यामुळे आखाडे यांच्या कुटुंबातील सदस्यांना काही प्रमाणात का होईना ऐन संकटकाळी मदतीचा हातभार लागला आहे.दरवर्षी पावसाळ्यात वीज वितरण कंपनीच्या अयोग्य नियोजना अभावी आणि ठेकेदारांच्या दुर्लक्षित पणामुळे इथे शॉक लागून एकना एक घोडा दगावतो पण कष्टकरी अश्वपालकांना कोण मदत मिळून देण्यासाठी प्रयत्न सुध्दा करत नाही आधिकारी वर्ग सुद्धा लक्ष देत नाहीत ते हात झटकून मोकळे होतात.ज्याचा घोडा शॉक लागून दगावला आहे त्या अश्वपालकाला अनेकदा शासकीय मदत येण्याची वाट पहात बसावी लागते परंतु प्रत्येकवेळी अश्वपालकांची घोर निराशा झाली आहे. शिवाजी शिंदे यांनी या कठीण प्रसंगी आखाडे कुटुंबाला आर्थिक हातभार लावल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरा-तून कौतुक होत आहे. धनगर समाजाचे अध्यक्ष राकेश कोकळे यांनी शिवाजी शिंदे यांचे मनःपूर्वक आभार मानले.

पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा दौरा

दै.रायगड नगरी । अलिबाग

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क, विधी व न्याय राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा पुढील प्रमाणे..

शनिवार दि.१९ सप्टेंबर, २०२० रोजी सकाळी ९.०० वा. सुतारवाडी, ता.रोहा, येथून वाहनाने ता.श्रीवर्धनकडे प्रयाण. दुपारी ११.०० वा. माझे कुटुंब-माझी जबाबदारी कोविड-१९ बाबत जनजागृती कार्यक्रमांतर्गत श्रीवर्धन येथे नगरपरिषद क्षेत्रात गृहभेटी. दुपारी १२.०० वा. श्रीवर्धन येथून शासकीय वाहनाने ता.म्हसळाकडे प्रयाण. दुपारी १२.३० वा. माझे कुटुंब-माझी जबाबदारी कोविड-१९ बाबत जनजागृती कार्यक्रमांतर्गत म्हसळा येथे नगरपंचायत क्षेत्रात गृहभेटी. दुपारी १.३० वा. राखीव. दुपारी २.३० वा. म्हसळा येथून शासकीय वाहनाने ता.माणगावकडे प्रयाण. दुपारी ३.३० वा. माझे कुटुंब-माझी जबाबदारी कोविड-१९ बाबत जनजागृती कार्यक्रमांतर्गत माणगाव येथे नगरपंचायत क्षेत्रात गृहभेटी. दुपारी ४.३० वा. माणगाव येथून शासकीय वाहनाने ता.तळाकडे प्रयाण. दुपारी ५.३० वा. माझे कुटुंब-माझी जबाबदारी कोविड-१९ बाबत जनजागृती कार्यक्रमांतर्गत तळा येथे नगरपंचायत क्षेत्रात गृहभेटी. सोईनुसार ता.तळा येथून शासकीय वाहनाने सुतारवाडी, ता.रोहाकडे प्रयाण. सुतारवाडी निवासस्थान येथे आगमन व राखीव.

रविवार दि.२० सप्टेंबर, २०२० रोजी राखीव. स्थळ :- सुतारवाडी निवासस्थान, ता.रोहा. सोमवार दि.२१ सप्टेंबर, २०२० रोजी सकाळी ७.०० वा. सुतारवाडी निवासस्थान येथून शासकीय वाहनाने मुंबईकडे प्रयाण. सकाळी १०.०० वा. सुनीती शासकीय निवासस्थान येथे आगमन व राखीव.

खारघर वसाहतीत पावसाळ्यातही पाणी टंचाई

नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांचे सिडकोला पत्र

दै.रायगड नगरी । पनवेल

धो धो पाऊस पडत असताना खारघर वसाहतीत मात्र पाणीटंचाई निर्माण झालेले आहेत. प्रभाग क्रमांक चार मधील काही भाग टंचाईग्रस्त असून येथील रहिवाशांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. यासंदर्भात स्थानिक नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी सिडको पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना पत्र देऊन याबाबत त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

खारघर वसाहतीला हेटवणे धरणातून पाणीपुरवठा केला जातो. इतर वसाहतींच्या तुलनेत खारघर ला मागणीच्या आसपास पाणी मिळत होते. त्यामुळे फारशी ओरड या वसाह-तीत दिसून आलेले नाही. दरम्यान गेल्या काही महिन्यांपासून पाणीटंचाई निर्माण झालेले आहे.

प्रभाग क्र. ४ मधील से १९,२०,२१ व ११,१३ येथील बहुतांश सोसायटीमध्ये मागील एक महिन्यापासून पाणी पुरवठा हा एकतर कमी दाबाने किंवा मागणी पेक्षा कमी होतांना दिसून येत आहे. सध्य स्थितीत पावसाळा सुरू असतांना पाण्याचा तुटवडा कसा ?असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

सोसायटीची पाईपलाईन पूर्वीची आहेत किंवा तिचा व्यास छोटा असल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर पाणीच्या मीटर जवळ घाण अडकली असल्याने पाणी कमी येत असल्याची शक्यता आहे.

पाईपलाईन वरती असल्याकारणाने पाणी कमी दाबाने येते असे मतही सोसायटीच्या पदाधिकार्यांनी व्यक्त केले आहे. यासंदर्भात नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी सिडकोच्या कार्यकारी अभियंता यांना पत्र देऊन प्रभाग क्रमांक चार मध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे. वर्षानुवर्षे सदर पाईपलाईन मधून व्यवस्थित पाणीपुरवठा होत आहे मग आत्ताच असे काय झाले. सिडकोने त्वरित लक्ष घालून योग्य त्या उपाय योजना कराव्यात अन्यथा कार्यकारी अभियंत्यांच्या दालनासमोर आंदोलन करावे लागेल.

> आमच्या असेही निदर्शनास आले आहे की सिडकोचे कर्मचारी मुद्दाम पाण्याचा वॉल्व कमी प्रमाणात सोडतात. असे भविष्यात आढळून आल्यास त्यांना त्याच ठिकाणी रहिवाशी योग्य ते उत्तर देतील.
>
> **नेत्रा किरण पाटील**
> **नगरसेविका पनवेल महापालिका**

पाहिजेत

खोपोली इमॉजिकाजवळ एका वॉटर पॅकेजिंग कंपनीमध्ये मायक्रोबायोलॉजिस्ट (M.sc/B.sc) ची आवश्यकता आहे. तरी वरील पदासाठी किंवा तत्सम अनुभव असणाऱ्या इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

(जेवणाची/राहण्याची सोय केली जाईल याची नोंद घ्यावी.)

संपर्क : 9892233614 / 7498280800

पृष्ठ क्र.१ वरुन...

पोलिसांतर्फे बंदुकीच्या फैरी झाडून शासकीय मानवंदना

मान्यवर, विविध राजकीय पक्षांचे पुढारी, नेते, नागरिक, विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात येते. मात्र ऐतिहासिक महत्व असलेल्या आणि स्वातंत्र संग्रामातील सुवर्ण पान म्हणुन ओळखला जाणाऱ्या चिरनेर जंगल सत्याग्रहाचा स्मृती दिनाचा कार्यक्रम अवघ्या ५ दिवसांवर येऊन ठेपला आहे.परंतु दरवर्षी २५ सप्टेंबर साजरा करण्यात येणाऱ्या स्मृती दिनाचा कार्यक्रम सध्या कोरोनाच्या सावटाखाली आला आहे.

दरम्यान २५ सप्टेंबर साजरा करण्यात येणाऱ्या स्मृती दिनाच्या कार्यक्रम सध्या कोरोनाच्या सावटाखाली आला असला तरी तो कशा पद्धतीने साजरा करावा यासाठी शासनाकडून अभिप्राय मागविण्यात आला असल्याची माहिती उरण गटविकास अधिकारी श्रीमती निलम गाडे यांनी दिली आहे.दरवर्षी कार्यक्रमावर होणाऱ्या खर्चासाठी रायगड जिल्हा परिषदेकडे निधीसाठी पत्रव्यवहारही करण्यात आला आहे.कोरोनाच्या पाश्र्वभूमीवर शासनाकडून येणाऱ्या आदेशानुसार कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात येणार असल्याची माहितीही गटविकास अधिकारी गाडे यांनी दिली आहे.

तर कोरोनाच्या पाश्र्वभूमीवर अगदी मोजक्या मान्यवरांच्या उपस्थितीत आणि सर्वच नियमांचे काटेकोरपणे पालन करीत चिरनेर जंगल सत्याग्रहाचा स्मृती दिनाचा कार्यक्रम सोहळा साजरा करण्यात येणार आहे. हुतात्म्यांना बंदुकीच्या फैरी झाडून शासकीय मानवंदना दिली जाईल.मात्र यावर्षी गर्दी टाळून कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यार्थ्यांसह, नागरिक, मान्यवरांनाही कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात येणार नसल्याची माहिती उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दिली आहे.

कोलाड रोरो सेवा दीड महिन्यानंतर सुरळीत सुरू

वगळता सर्व वाहतुक पूर्णपणे बंद करण्यात आली होती. यामुळे कोलाड कोकण रेल्वे रोरो सेवेला मोठा फटका बसला असुन यामुळे कोकण रेल्वेला मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागले.

एका बाजुला कोरोना विषाणुने जगात हाहाकार माजवला असतांना शासकीय यंत्रणा त्यावर मात करण्यासाठी युद्धपातळीवर काम करीत असतांना दुसरीकडे त्याचा प्रादुर्भाव पसरू नये यासाठी संपुर्ण भारत देशातील रेल्वे सेवा पूर्णपणे बंद करण्यात आली होती व यामध्ये अत्यावश्यक सेवेची माल वाहतुक सेवा सुरु ठेवली होती.

कोलाड कोकण रेल्वेची रोरो सेवा अनेक वर्षापासून सुरु असुन या रोरो सेवेमुळे मुंबई, ठाणे,पुणे,रायगड,येथील औद्योगिक क्षेत्रातील माल, याच बरोबर किराणा,फळे,व इतर वस्तु याचा माल वाहतुक कोलाड ते सुरतकर सुमारे ७९० किमी अंतरावर अतिशय कमी खर्चात जात होता.या रोरो सेवेत एकाच वेळी ४५ते ५० मालवाहू ट्रक जात होते परंतु कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अत्यावश्यक वगळता सर्व वाहतुक बंद करण्यात आली आहे.त्यामुळे कोलाड रोरो सेवा येथुन मेडिकल औषधे व अत्यावश्यक वस्तु यांची फक्त ८ते १०मालवाहू ट्रक सोडले जात होते.

त्यानंतर मागील दीड महिन्यांपूर्वी प्रचंड मोठया प्रमाणात पडलेल्या पावसामुळे पेडणे भोगदयावर माती आल्याने कोलाड रोरो सेवा बंद करण्यात आली.कोकण रेल्वेचे व्यस्थापकिय संचालक संजय गुप्ता यांनी मुंबई गोवा कोकण रेल्वेची दोन वेळा पाहणी केली होती.नंतर पेडणे भोगदयाचे काम पूर्ण झाल्यानंतर कोकण रेल्वेची कोलाड रोरो सेवा सुरळीत सुरू करण्यात आली आहे.

दिघी सागरी पोलिसांनी केली अटक

घेऊन गुन्ह्यातील आरोपींनी या ८२ विद्युत खांबांची चोरी केली. त्याचप्रमाणे कोणाला संशय येऊ नये म्हणून आरोपी भरदिवसा हे विद्युत खांब चोरत असत.

ही बाब निदर्शनास आल्यानंतर १५ सप्टेंबर २०२० रोजी दिघी सागरी पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती व तांत्रिक तपासाच्या माध्यमातून दिघी सागरी पोलिसांनी सदरची कारवाई केली असून गुन्ह्यातील १००% मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. सदर चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी व विद्युत महामंडळाचे ठेकेदार उदय गोपाळ माळी व त्यांचे साथीदार विशाल मयूर साबळे, प्रतीक रमेश जाधव यांना दिघी सागरी पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

रायगडचे पोलीस अधीक्षक श्री. अनिल पारस्कर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री. सचिन गुंजाळ, उप अधीक्षक श्री. काशीद यांच्या सूचनेनुसार दिघी सागरी पो-लीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. महेंद्र शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार संदीप चव्हाण, पो.हे.काँ. विनायक पाटील, पो.काँ. प्रकाश सुर्वे, संतोष कदम, पो.ना. निलेश सोनावणे, पो.काँ.अमोल दळवी,अर्चित भोगावकर, पप्पू भांडलकर, अमोल घेगडे, ओमकार माळी यांनी ही कारवाई करून अवघ्या २४ तासांत आरोपींना अटक केली असून परिसरांत पोलिसांच्या कार्यतत्परतेचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

मुख्यालय आणि क्रिकेट प्रशिक्षण केंद्रला मंजूरी

नसल्याने रुग्णांचे मृत्यू होत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. पनवेल पालिकेने देखील ज्यादा देयक आकारणाऱ्या रुग्णालयावर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली. पालिकेच्या महासभेत मान्यतेकरिता सादर करण्यात आलेल्या अंतरराष्ट्रीय स्थरावरील क्रिकेट आकदमी स्थापन करण्यासोबत क्रिकेट प्रशिक्षण देण्यासाठी संस्थेची नेमणूक करण्याच्या प्रस्थावावर झालेल्या चर्चे दरम्यान विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे आणि शेकाप नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी प्रस्तावाला स्थगित ठेवण्याचे सुचविले. मात्र सत्ताधारी पक्षा कडे असलेल्या संख्या बळावर हा प्रस्ताव मान्य करण्यात आला असून पालिकेचे भव्य मुख्यालय बांधण्यासाठी कंपनी नियुक्ती करण्याच्या प्रस्तवाला देखील मान्यता देण्यात आली आहे. पालिकेचे भव्य मुख्यालय बांधण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यानी आयुक्त गणेश देशमुख यांच्या कार्यकालात जागा सुचवली आहे. रेमडेसिविर आणि टोसिलोझुमब हे औषध कोरोना रुग्णनसाठी उपलब्ध होत नाहीत याकडे प्रितम म्हात्रे वारवार लक्ष वेधत होते. यावर सभेत निर्णय घेणे अपेक्षित होते मात्र तसे झाले नाही.

एकंदरीत पनवेलमध्ये दररोज जवळपास तीनशे कोरोनाचे पेशंट सापडून येत आहेत मात्र पालिकेला त्याचे गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कोरोना रुग्णांसाठी नवीन रुग्णालय ऑक्सीजन बेडची व्यवस्था, आयसीयूची व्यवस्था करणे अपेक्षित होते. मात्र या सभेत कोरोनावर केवळ चर्चा करण्यात आली व कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. एकीकडे महाआघाडीचे नेते पनवेल आणि उरण मध्ये कोरोना रुग्णांसाठी हॉस्पिटल उभरावे यासाठी प्रयत्न करत आहेत. तर दुसरीकड़े महापालिका केवल चर्चा करताना दिसत आहे. सत्ताधारी पक्षाचे नगरसेवकच प्रशासनाच्या महापौराना कोरोना प्रश्न विचारत होते. नवीन पनवेल सेक्टर ११ या ठिकाणी सिडकोतर्फे फुटबॉल मैदान उभारण्यात येणार होते. यासाठी करोडो रुपयांचा खर्च सिडको करणार होती मात्र पनवेल पालिकेने या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचे ठरवले असल्याने त्यासाठी पालिकेला खर्च करावा लागणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

चला घेऊ समजून....माझे कुटुंब-माझी जबाबदारी

गेल्या महिन्यापासून आपण सर्वचजण करोना विषाणूशी लढाई लढत आहोत. नागरिकांच्या आरोग्याच्या रक्षणासाठी शासन आणि प्रशासनही शक्य ते सर्व प्रयत्न करीत आहेत. शासनाने कोविड-१९ नियंत्रणासाठी तसेच मृत्यू दर कमी करण्यासाठी माझे कुटुंब-माझी जबाबदारी कोविडमुक्त महाराष्ट्र ही मोहीम हाती घेतली आहे.

नेमकी काय आहे ही मोहीम...चला घेऊ समजून या ले-खाद्वारे..!

माझे कटुंब-माझी जबाबदारी मोहिमेंतर्गत राज्यातील शहर, गाव, पाडे-वस्त्या, तांडे यातील प्रत्येक नागरिकांची आरोग्य तपासणी, कोमॉर्बिड आजार असल्यास उपचार आणि प्रत्येक नागरिकास व्यक्तीश: भेटून आरोग्य शिक्षण दिले जाणार आहे. ही मोहीम १५ सप्टेंबर ते २५ ऑक्टोबर २०२० या कालावधीमध्ये घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

या मोहीम कालावधीमध्ये गृहभेटी देण्यासाठी आरोग्य पथके तयार केली आहेत. रायगड जिल्ह्यासाठी १ हजार ५०० आरोग्य पथके तैनात केली आहेत. एका पथकामध्ये १ आरोग्य कर्मचारी आणि २ स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेले स्वयंसेवक असतील. एक पथक दररोज ५० घरांना भेट देईल. भेटीदरम्यान घरातील सर्व सदस्यांचे तापमान, Sp02 तपासणे तसेच Comorbid Condition आहे का याची माहिती घेईल. ताप, खोकला, दम लागणे, Sp02 कमी असणे, अशी कोविडसदृश्य लक्षणे असणाऱ्या व्यक्तींना जवळच्या Fever Clinic मध्ये संदर्भित करण्यात येईल. Fever Clinic मध्ये कोविड-१९ प्रयोगशाळा चाचणी करुन पुढील उपचार केले जातील. कोमॉर्बिड Condition असणारे रुग्ण नियमित उपचार घेतात का याची खात्री केली जाईल आणि आवश्यक तेथे औषधे व तपासणीसाठी संदर्भित केले जाईल. प्रत्येक ५ ते १० पथकांमागे एक डॉक्टर उपचार व संदर्भसेवा दिली जाईल. घरातील सर्व सदस्यांना व्यक्तीश: प्री-कोविड, कोविड आणि पोस्ट- कोविड परिस्थितीनुसार आरोग्य संदेश समजावून सांगितले जातील. लोकप्रतिनिधी व खाजगी रुग्णालय, स्वयंसेविका यांचा या मोहिमेसाठी सहभाग घेतला जात आहे.

माझे कुटुंब-माझी जबाबदारी ही मोहीम कोविड-१९ साथ नियंत्रणासाठी अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे जिल्ह्यात मोहिमेची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल आणि सर्व संशयीत कोविड-१९ रुग्ण आणि कोमॉर्बिड व्यक्ती यांना तपासणी, चाचणी व उपचार या सेवा मिळतील, याची दक्षता घेण्यात येईल.

मोहिमेचे उद्दिष्ट

गृहभेटीद्वारे संशयीत कोविड तपासणी व उपचार. अतिजोखमीची (Co-morbid) व्यक्ती ओळखून त्यांना उपचार व कोविड-१९ प्रतिबंधासाठी आरोग्य शिक्षण. सारी / इली (SARI / ILI) रुग्णांचे गृहभेटीद्वारे सर्वेक्षण, कोविड-१९ तप-ासणी आणि उपचार. गृहभेटीद्वारे प्रत्येक नागरिकाचे कोविड-१९ बाबत आरोग्य शिक्षण.

मोहिमेची व्याप्ती:-

माझे कुटुंब-माझी जबाबदारी मोहीम राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, ग्रामपंचायत,गट, मंडळ इ. ठिकाणी राबविली जाईल. या मोहिमेंतर्गत राज्यातील सर्व शहरे, गावे, वाडी, तांडे, पाडे इ.मध्ये राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाची तपासणी केली जाईल.

माझे कुटुंब-माझी जबाबदारी मोहीम अंमलबजावणी

गृहभेटीसाठी एक आरोग्य कर्मचारी आणि २ स्वयंसेवक (एक पुरुष व एक स्त्री) असे तिघांचे पथक असेल. एक पथक १ दिवसात ५० घरांना भेटी देईल. पहिली फेरी १५ दिवस असे गृहीत धरुन संपूर्ण लोकसंख्येसाठी एकूण पथकांची संख्या निश्तिच केली जाईल. (उदा. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांची लोकसंख्या ५० हजार असेल तर या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यकक्षेत १० हजार घरे असतील. एकूण १५ दिवस गृहभेटी द्यावयाच्या झाल्यास दररोज सरासरी ६५० घरांना भेटी द्याव्या लागतील. यासाठी १३ टीम आवश्यक आहेत. ग्रामीण भागासाठी ३० हजार लोकसंख्येच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये साधारणत: ६ हजार कुटुंबे असतील,एकूण १५ दिवस गृहभेटी द्यावयाच्या झाल्यास दररोज सरासरी ४०० घरांना भेटी द्याव्या लागतील. यासाठी ८ पथके स्थापन करावी लागतील.) हे सूत्र लक्षात घेऊन प्रशासनातर्फे नियोजन केले जात आहे.

एकूण पथकांची संख्या आणि स्वयंसेवक ठरल्यानंतर ग्रामीण भागामध्ये प्रत्येक पथकास लोकसंख्येनुसार गाव निश्चित करुन दिलेल्या तक्त्यामध्ये नियोजन केले जाईल. शहरी भागामध्ये दैनंदिन सर्वेक्षणासाठीचा भाग निश्चित करताना गल्ली, रस्ता, घर नंबर यावरुन निश्चिती केली जाईल.

पथकाचे स्वरुप

पथकामध्ये एक आरोग्य कर्मचारी किंवा आशा आणि २ स्थानिक स्वयंसेवक (१ पुरुष व १ स्त्री) असतील. हे स्वयंसेवक स्थानिक सरपंच, नगरसेवक यांच्या सहाय्याने निश्चित केले जातील. पथकातील सदस्यांना कोरोना दूत असे संबोधण्यात येईल. सरपंच, नगरसेवक यांच्याकडून स्वयंसेवक प्राप्त न झाल्यास त्याऐवजी एक आरोग्य कर्मचारी / आशा असेल. अशा वेळी पथकात २ आरोग्य कर्मचारी / आशा असतील. महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, ग्रामीण भाग यामध्ये खालीलपैकी आरोग्य कर्मचारी सर्वेक्षणासाठी घेण्यात येतील. बहुविध आरोग्य सेविका (स्त्री) (ए.एन.एम.), बहुविध आरोग्य सेवक (पुरुष) (आरोग्य सेवक), आशा कार्यकर्ती, अंगणवाडी कार्यकर्ती (आवश्यकतेनुसार महिला व बाल कल्याण विभागाची परवानगी घेऊन), किमान १० वी पास कोविड दूत (स्वयंसेवक). प्रत्येक पथकात १ पुरुष व १ स्त्री, प्रत्येक ५ ते १० पथकामागे १ डॉक्टर वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य पथक किंवा समुदाय आरोग्य अधिकारी.

गृहभेटी - पहिली फेरी

प्रत्येक घरात शिरण्यापूर्वी दाराबाहेर सोयीच्या ठिकाणी स्टिकर लावले जातील. घरामध्ये गेल्यानंतर प्रत्येक सदस्याची पमध्ये नोंद घेतली जाईल आणि त्यानंतर Infrared Thermometer ने तापमान Pulse Oxymeter Zo SpO2 मोजले जाईल. ताप असलेली व्यक्ती आढळल्यास (तापमान ९८.६ F) अशा व्यक्तीस खोकला, घशात दुखणे, थकवा इ. लक्षणे आहेत का याची माहिती घेतली जाईल. घरातील व्यक्तीस मधुमेह, हृदयरोग, कर्करोग, किडनी आजार, अवयव प्रत्यारोपण, दमा इ. आजार आहेत का याबाबत विचारणा करून दिलेल्या उत्तरानुसार पमध्ये माहिती नोंदविली जाईल. ही माहिती ताप १००.४ अंश फॅरनहाईट (३८ सी) इतका किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास किंवा SpO2 ९५ टक्के पेक्षा कमी असल्यास रुग्णास जवळच्या Fever Clinic मध्ये संदर्भीत केले जाईल. रुग्णास SARI / ILI लक्षणे असल्यास Fever Clinic मध्ये संदर्भीत केले जाईल. संदर्भीत करताना रुग्णास संदर्भ चिठ्ठी देवून तसेच कोविड-१९ प्रतिबंधाचे सर्व संदेश रुग्ण व घरातील सर्व नातेवाईकांना समजून सांगण्यात येतील. घरातील कोणत्याही व्यक्तीस मधुमेह, उच्च रक्तदाब, किडनी आजार, जीसरप transplant, लठ्ठपणा, दमा किंवा इतर मोठे आजार असल्यास त्यांची SpO2 तपासणी पुन्हा करुन खात्री करतील. अशा रुग्णांचे तापमान ९८.७ F (३७.C) पेक्षा जास्त असेल आणि १००.४ F पेक्षा कमी असेल तरी सुद्धा त्यांना Fever Treatment Center येथे संदर्भीत केले जाईल. ताप SpO2 ९५ पेक्षा कमी, Co-morbid Condition या तीन पैकी कोणतेही २ लक्षणे आढळल्यास अशा व्यक्तीस High risk संबोधून त्वरीत रुग्णवाहिका बोलावून जवळच्या Fever Treatment Center / Vovid Care Center ला संदर्भीत केले जाईल.

गृहभेटी- दुसरी फेरी

कुटुंबातील सदस्यांची माहिती पहिल्या फेरीत घेतलेली असल्यामुळे दुसऱ्या फेरीमध्ये दररोज ७५-१०० घरे करतील. दुसऱ्या फेरीमध्ये सर्वांचे तापमान व SpO2 मोजून दरम्यानच्या काळात घरातील कोणाला मोठा आजार होऊन गेला काय याची खात्री केली जाईल. पुन्हा एकवेळा आरोग्य संदेश दिले जातील. ताप १००.४ फॅरनहरिट (३८.C) पेक्षा किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास आणि हे SpO2 94 टक्के पेक्षा कमी असल्यास रुग्णास संदर्भीत करतील. पहिल्या फेरीच्या वेळी गैरहजर असणाऱ्या घरातील व्यक्तींची Co-morbid Condition साठी चौकशी करतील.

माझे कुटुंब-माझी जबाबदारी मोहीम बक्षिस योजना

बक्षिस योजना व्यक्ती आणि संस्थांसाठी असेल. व्यक्तींसाठीच्या योजनांमध्ये निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, आरोग्य शिक्षण मेसेजेसच्या स्पर्धा इ. घेण्यात येतील तर संस्थांसाठी वेगवेगळ्या संस्थांच्या कामकाजानुसार बक्षिस योजना देण्यात येईल. बक्षिस योजनेची माहिती राज्यस्तरावरुन वृत्तपत्राद्वारे दिली जाणार आहे. त्यामध्ये वैयक्तिक बक्षिसासाठीचे साहित्य जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्याबाबत कळविण्यात येणार आहे. यासाठी जिल्हाधिकारी हे एक अधिकारी निश्चित करतील. आलेले साहित्य तपासून त्यांना गुणानुक्रमांक देण्यासाठी जिल्हाधिकारी हे स्थानिक स्तरावर एक समिती नेमतील व त्या समितीचे प्रमुख गुणानुक्रमांक निश्चित करतील. व्यक्तींसाठीच्या बक्षिस योजनेत विद्यार्थी, पालक, सामान्य व्यक्ती यांच्यासाठी ही योजना लागू राहील. राज्यस्तरावर वृत्तपत्रांमध्ये आणि दूरचित्रवाणीवरुन जनतेला सहभागासाठी आवाहन करण्यात येईल. प्राप्त झालेले निबंध, पोस्टर्स, मेसेजेस, शॉर्ट फिल्म या अनुभवी परिक्षकांकडून तपासले जातील. बक्षिस मिळालेला निबंध, पोस्टर्स, फिल्मस् इ. ना राज्य शासनातर्फे प्रसिद्धी देण्यात येईल.

विजेत्यांना ढाल आणि बक्षिस खालीलप्रमाणे देण्यात येईल:-

पहिले बक्षिस- राज्यस्तर १० हजार, जिल्हास्तर व महानगरपालिकास्तर ५ हजार, आमदार मतदारसंघ स्तर ३ हजार. दुसरे बक्षिस- राज्य स्तर ५ हजार, जिल्हा स्तर व महानगरपालिका स्तर ३ हजार, आमदार मतदारसंघ स्तर २ हजार. तिसरे बक्षिस- राज्य स्तर ३ हजार, जिल्हा स्तर व महानगरपालिका स्तर २ हजार, आमदार मतदारसंघ स्तर १ हजार राहील. जिल्हास्तरावर नागरी आणि ग्रामीण असे २ विभाग असतील. प्रत्येक विभागात प्रथम ३ संस्था निवडण्यात येतील व त्यांना बक्षिस दिले जाईल.

संस्थेचा गुणानुक्रम ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे निकष असतील:-मोहीम पहिल्या फेरीमधील गृहभेटीचे प्रमाण (१० गुण). प्रति हजार लोकसंख्येमध्ये कोविड-१९ चाचणी (मोहीम कालावधीमध्ये) प्रमाण (३० गुण). सीएसआर अंतर्गत किती मास्क व हात धुण्यासाठी साबण वाटप केले, प्रति हजार लोकसंख्या (२० गुण). किती SARI / ILI रुग्ण प्रति हजार लोकसंख्येत शोधून त्यांची चाचणी केली (१० गुण). कोविड-१९ मृत्यू प्रमाण (३० गुण). मिळालेल्या गुणांनुसार ग्रामपंचायत / वार्डातील हिरवे (७५ टक्के प्लस) पिवळे (४१-७४ टक्के) लाल (४१ टक्के पेक्षा कमी) कार्ड देण्यात येईल.

हिरवे कार्ड दिलेल्या संस्थांना ढाल आणि बक्षिसे खालीलप्रमाणे देण्यात येतील:- पहिले बक्षिस- राज्यस्तर १ लाख, जिल्हास्तर व महानगरपालिकास्तर ५० हजार, आमदार मतदारसंघ स्तर १० हजार. दुसरे बक्षिस- राज्यस्तर ५० हजार, जिल्हास्तर व महानगरपालिकास्तर ३० हजार, आमदार मतदारसंघ स्तर ५ हजार. तिसरे बक्षिस-

राज्यस्तर ३० हजार, जिल्हास्तर व महानगरपालिकास्तर २० हजार, आमदार मतदारसंघ स्तर ३ हजार राहील. बक्षिस मिळालेल्या संस्थांना जिल्हा आणि राज्य स्तरावर समारंभ आयोजित करुन जिल्हा स्तरावरुन मा.पालकमंत्री यांच्या हस्ते आणि राज्यस्तरावर मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात येईल.

शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी
रायगड-अलिबाग

श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांच्या शारीरिक तपासणीसाठी ९२ पथके तैनात...

माझे कुटुंब माझी जबाबदारी मिशन उद्यापासून सुरू : बाळासाहेब भोगे

दै.रायगड नगरी । विजय गिरी

श्रीवर्धन : शासनाच्या माझे कुटुंब माझी जबाबदारी या माध्यमातून श्रीवर्धन तालुक्यातील प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या शारीरिक तपासणीसाठी श्रीवर्धनमध्ये ९२ पथके तैनात करण्यात आले असल्याची माहिती गट विकास अधिकारी भोगे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पंचायत समिती सभापती बाबुराव चोरगे सदस्य मंगेश कोमनाक आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रात कोरोनाची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने योजलेल्या माझे कुटुंब माझी जबाबदारी या मिशनचा १२ सप्टेंबर रोजी परिपत्रक निघाला असून श्रीवर्धन पंचायत समितीच्या माध्यमातून १७ सप्टेंबर रोजी अमलबजावणी करण्यात आली असून उद्या पासून तालुक्यातील विविध गावात तपासणीसाठी यंत्रणा सुरू केली जाणार आहे. श्रीवर्धन तालुक्यातील प्रत्येक गावात घरो घरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येणार आहे. कोणाला आजार आहेत का? त्याच बरोबर प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची ऑक्सिजनची व शारीरिक तापमानाची मात्र तपासली जाणार आहे. व याची संपूर्ण माहिती शासनाच्या अँप मध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे.

शहरी भागाबरोबर ग्रामीण भागात देखील कोविड झपाट्याने पसरत आहे. त्यामुळे तालुका आरोग्य अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली एक शिक्षक, एक अंगणवाडी सेविका, एक आशा वर्कर अशी तिघांच पथक असे ९२ पथक तैनात करण्यात आले आहेत. एक पथक एक दिवसाला ५० कुटूंबाच्या तपासणी करणार असल्याचा लक्ष ठेवण्यात आला आसलेल्याची माहिती गटविकास अधिकारी बाळासाहेब भोगे यांनी दिली.

नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या सूचनेनुसार म.जी.प्राधिकरण अधिकाऱ्यांची फिल्टर हाऊसला भेट

दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे

माथेरान : माथेरान जीवन प्राधिकरण मार्फत नेहमीच गढूळ पाण्याच्या विसर्गामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याने वारंवार याबाबत तक्रारी केल्या जात होत्या या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा प्रेरणा प्रसाद सावंत यांनी म.जी.प्राधिकरण अधिकाऱ्यांना त्याप्रमाणे सूचना दिल्यानुसार दि.१८ रोजी अधिकारी वर्गाने (फिल्टर हाऊस) जल शुद्धीकरण केंद्रावरील पाण्याच्या टाक्या ताबडतोब स्वच्छ करण्याचे कामगारांना आदेश दिल्यावर या टाक्यांची स्वच्छता करण्यात आली आहे.

यावेळी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, नगरपरिषदेचे गटनेते प्रसाद सावंत,माथेरान जीवन प्राधिकरणचे शाखा अभियंता किरण शानबाग, पी. एस.पाटील, बी.एस. माने, लिपिक जे. टी. दाभणे,मीटर चालक आकाश शेळके यांसह या कार्यालयाचे लाईन मॅन,संबंधित ठेकेदार आदी उपस्थित होते. अनेकदा रस्त्यावर असणाऱ्या पाण्याच्या जोडण्या दुरुस्ती करताना संबंधित ठेकेदार हे रस्त्याचे क्ले पेव्हर ब्लॉक काढताना योग्य काळजी घेत नाहीत.कामे पूर्ण झाल्यावर तसेच रस्ते तात्पुरती मलमपट्टी करत असल्याने रस्त्यांचीअवस्था खूपच बिकट झाली आहे. दरवेळी ह्या रस्त्यांची डागडुजी करणे नगरपरिषदेच्या आवाक्याबाहेरचे असते यासाठी संबंधित ठेकेदाराने पाणी जोडणी अथवा काही दुरुस्ती करताना रस्त्यांची जी काही वाताहत होत आहे त्यासाठी ठराविक रक्कम नगरपरिषदेकडे जमा केल्याशिवाय हे म.जी.प्राधिकरणचे ठेकेदार वठणीवर येणार नाहीत असे नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी उपस्थितांसमोर स्पष्ट केले.

इथे पाणी बिले वेळेत अदा केली जात असताना नागरिकांना पावसाळ्यात नेहमीच गढूळ पाण्याचा पुरवठा केला जात असून बिलांची सुद्धा भरमसाठ आकारणी केली जात आहे. पावसाळ्यात पाण्याचा वापर सुध्दा कमी प्रमाणात नागरीक करीत आहेत. अनेकदा दिवसांआड सुध्दा पाणी पुरवठा केला जात आहे. याकामी प्रेरणा सावंत यांनी उपस्थित अधिकारी वर्गाच्या सर्व बाबी निदर्शनास आणून दिल्या.काही भागात पाणी जोडणी चे पाईप चॉकप झाल्याने त्या त्या ठिकाणी कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे तो ताबडतोब सुरळीत चालू करून नागरिकांना उद्भवणाऱ्या समस्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करावेत असेही प्रेरणा सावंत यांनी सांगितले. लवकरच सर्व प्रकारच्या समस्या निश्चितपणे मार्गी लावल्या जातील असे शाखा अभियंता किरण शानबाग यांनी सांगितले. यावेळी कार्यतत्पर नगर-सेवक शकील पटेल यासंह नागरिक उपस्थित होते.

नागरिकांना मोफत मास्क, औषधे व सॅनिटायझरचे वाटप

दै.रायगड नगरी । पनवेल

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजपा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनानुसार नमो नमो उत्तर भारतीय मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आर.के. दिवाकर, संघटनमंत्री सुशील जोशी, प्रदेश उपाध्यक्ष संतोषकुमार शर्मा यांच्यामार्फत देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच खारघर तळोजा मंडल सोशल मीडिया संयोजक अजय माळी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नागरिकांना मोफत मास्क, औषधे व सॅनिटायझरचे वाटप डी- मार्ट, खारघर पोलिस स्टेशन, खारघर वाहतूक विभाग या ठिकाणी करण्यात आले .

या कार्यक्रमास युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष विक्रांत पाटील, आर .के.दिवाकर, सुशील जोशी, संतोष शर्मा, खारघर भाजप मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सह- संयोजिका सोशल मीडिया उत्तर रायगड जिल्हा मोना आडवाणी, उत्तर रायगड युवा मोर्चाचे अध्यक्ष मयुरेश नेतकर, युवानेते समिर कदम, राजेंद्र मांजरेकर, मंडल उपाध्यक्ष बिना गोगरी, विपुल चौटलिया, अजय माळी, वैशाली प्रजापती, नीलम विसपुते, अंकिता वारंग, अमित अगरवाल, सुशील तिवारी, सोनू पांडे, पंकज सिंह आदी उपस्थित होते.

महाड इमारत दुर्घटने प्रसंगी सिडको अग्निशमन दलाने केलेल्या कार्याचा गौरव

दै.रायगड नगरी । नवीमुंबई

महाड येथे २४ ऑगस्ट २०२० रोजी कोसळलेल्या इमारतीच्या ढिगाऱ्याखाली सापडलेल्या लोकांचा शोध घेण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या बचाव कार्यादरम्यान सिडको अग्निशमन दलाच्या अधिकारी व जवानांनी केलेल्या कामाचा गौरव रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात आला.

या दुर्घटनेप्रसंगी सिडको अग्निशमन दलाने केलेल्या कामाची श्रीमती आदिती तटकरे, मा. पालकमंत्री, रायगड जिल्हा आणि श्रीमती निधी चौधरी, जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्रशंसा करून दिनांक १८ सप्टेंबर २०२० रोजी अलिबाग येथे पार पडलेल्या कार्यक्रमात सिडको अग्निशमन दलाच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांस प्रमाणपत्रही प्रदान करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील महाड येथे २४ ऑगस्ट २०२० रोजी तारिक मॅन्शन ही ५ मजली इमारत कोसळली होती. सदर इमारतीत २०० ते २५० रहिवासी राहात होते. इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अनेकजण अडकून पडले होते. या प्रसंगी हाती घेण्यात आलेल्या शोध व बचाव कार्यामध्ये सिडकोच्या अग्निशमन दलानेही भाग घेत ढिगाऱ्याखाली अडकून पडलेल्या रहिवाशांना बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफ व अन्य बचाव पथकांना सहकार्य केले.

नगरसेवक विक्रांत पाटील यांनी ड्रेनेज लाईनची समस्या काढली निकाली

दै.रायगड नगरी । पनवेल

शहरातील चिंतामणी हॉल समोरच्या ड्रेनेज लाईनचा विषय हा बरेच दिवस प्रलंबित होता. रस्त्याचे काम करतांना दाबला गेला होता, चेंबर चा शोध घेऊन ड्रेनेज लाईनशी जोडण्यात आला. यासाठी प्रभागातील नगरसेवक विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी सातत्याने महानगरपालिकाकडे सतत पाठपुरावा करून आज प्रत्यक्ष काम उभे राहून करून घेतले. शिवमंदिर समोर काही खड्डे पडले आहेत आणि ड्रेनेज चेंबरच्या बाजू ने खड्डा पडला आहे त्याची पाहणी स्थानिक नगरसेवक विक्रांत पाटील यांनी करून या संबंधी पनवेल महापालिकेच्या संबंधित अधिकार्यांना बोलावून काम करून घेतले व खड्डे बुजविण्यास सांगितले. त्यामुळे प्रभागातील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

पाटबंधारे खात्याच्या चतुर्थ कर्मचाऱ्यांना ग्रेडनुसार वेतन निश्चिती होण्यास विलंब

कोलाड येथील कर्मचाऱ्यांचे वित्त विभागाच्या मुख्य सचिवांकडे साकडे

दै.रायगड नगरी । वाकण

सातव्या वेतन आयोगाच्या १ मार्च, २०१९ रोजी निघालेल्या शासन निर्णयानुसार पाटबंधारे खात्याच्या वर्ग चारच्या चतुर्थ कर्मचाऱ्यांना अद्याप २१०० ऐवजी १९०० रुपये ग्रेड वेतन मिळत आहे. त्यामुळे शासन निर्णयानुसार देय असलेले ग्रेडनुसार २१०० रुपये वेतन निश्चिती होण्यास विलंब होत असल्याने पाटबंधारे खात्याच्या कोलाड विभागातील सुमारे १४ कर्मचाऱ्यांनी याप्रकरणी मंत्रालयातील वित्त विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना १० सप्टेंबर, २०२० ला केलेल्या लेखी निवेदनाद्वारे पत्रव्यवहार करून न्यायासाठी साकडे घातले आहे.

पाटबंधारे खात्याच्या कोलाड विभागातील राजेश मुंढे, अनिल गोळे, विजयानंद तेलंगे, सुनील दपके, चंद्रकांत फाटे, हरिश्चंद्र महाबळे, विकास पाटील, दत्ताराम जोशी, प्रल्हाद भोईर, गणेश शिंदे, प्रभाकर मगर, गणेश गाढे, विनायक आम्ब्रुस्कर, अशोक राजिवडे या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा यात समावेश आहे.

आपल्या या निवेदनात या कर्मचाऱ्यांनी म्हटले आहे की, शासन निर्णयानुसार तुम्हा सर्व कर्मचाऱ्यांना एप्रिल, २००९ पासून ग्रेड पे रुपये २१००/- प्रमाणे देय असल्याचे कर्मचारी कोषागार अधिकारी, रोहा यांनी १६ जुलै, २०१६ रोजी तसेच वित्त विभागाचे अप्पर सचिव (सेवा-३ व सेवा ९) यांनी २१ ऑगस्ट, २०१९ रोजी असे यापूर्वीच स्पष्ट केले होते. तसेच ५ मे, २०१० व ९ फेब्रुवर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार एक वर्षाने एक काल्पनिक वेतनवाढ देय आहे असेही त्यावेळी सांगण्यात आले होते. मात्र असे असूनही गेल्या दहा वर्षात खात्याच्या सर्व वरिष्ठांकडे अर्ज, वीनंती करून प्रत्यक्ष भेटूनही आम्हाला या आर्थिक लाभापासून वंचित ठेवल्याचे या कर्मचाऱ्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

याचदरम्यान वेतन पडताळणी अधिकाऱ्यांनी कोलाड कार्यालयात दिलेल्या भेटीच्या वेळी त्यांनी कोलाड येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितले होते की, मजूर व चौकीदार यांना रुपये, २ हजार प्रमाणे व शिपायांना फक्त रुपये, १९००/- प्रमाणे ग्रेड देय आहे. त्यामुळे विभागातील लिपिकांनी शिपायांची वेतन निश्चिती केली होती.

या तोंडी सूचनेनुसार केलेल्या वेतन निश्चितीमुळे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे. त्यामुळे आमच्या सत्य व वस्तुस्थितीदर्शक माहितीचा विचार करून सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित शासन निर्णयानुसार आमची वेतन निश्चिती करून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणीही या कर्मचाऱ्यांनी केली आहे.

राज्यपरिवहन बसस्थानकातील खड्डे वेळीच आवरा

दै.रायगड नगरी । रवींद्र कुवेसकर

उतेखोल/माणगाव : अर्ध्या वर्षाच्या प्रदीर्घ कालावधी नंतर आता लालपरी नेहमी प्रमाणे धावू लागणार. अशा वेळी माणगांव राज्य परिवहन महामंडळ बसस्थानकात खड्ड्यांचे साम्राज्य पुन्हा पसरायला सुरुवात झाली आहे. आधीच कोरोना संकटाने हैराण, त्यात वेळीच हे खड्डे आवरले नाही तर प्रवाशांना भोवणार. कारण बस स्थानकात शिरताना साचलेले पाणी अंगावर उडते, ते चुकविताना प्रवाशांची तारांबळ उडते. लोक म्हणतात प्रवास नको पण खड्डे आवरा या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विकासाच्या गप्पा मारणाऱ्यांना जनतेचा सवाल, दरवर्षी हे खड्डे का पडतात? या बाबतीत संबंधित ठेकेदार काय उपाययोजना करतात? एसटी बस स्थानकात शिरताना झोपलेल्या प्रवाशांना खड्ड्यांमुळे जाग येते पण संबंधित प्रशासनाला कधी जाग येणार ? या बाबत प्रवासी वर्गातून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. दरवर्षी पडणाऱ्या पावसामुळे हा आगार परिसर खड्ड्यांमुळे जलमय होतो. आता आगार व्यवस्थापन कोणती भूमिका घेणार याकडे प्रवाशांचे लक्ष लागून राहिले आहे.

सेवासप्ताह निमित्त पनवेल शहर मंडलातर्फे रुग्णालय, आदिवासीवाडी व कुष्ठरुग्ण वसाहतीत फळे वाटप

दै.रायगड नगरी । पनवेल

भारताचे यशस्वी व लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने पनवेल शहर मोर्च्याच्या वतीने सेवा सप्ताह कार्यक्रम अंतर्गत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल मधील रुग्णालय, तसेच गणेश नगर कुष्ठरोगी वसाहत, आदिवासीवाडी येथे आज(दि. १८) फळे वाटप करण्यात आली.

जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेता व गरीब, वंचित, दलित, आदिवासी आणि शेतकऱ्यांसाठी देवदूत प्रमाणे काम करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस सेवा सप्ताह म्हणून सामाजिक उपक्रमाने साजरा केला जात आहे. त्या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विविध समाजोपयोगी कार्यक्रमे पार पडत आहेत. त्या अंतर्गत पनवेल शहर भाजप मंडलाच्यावतीने पनवेल येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय, डॉ. गुणे रुग्णालय, डॉ. पटवर्धन रुग्णालय, तसेच एच ओ सी कॉलनीच्या मागील कातकरवाडी, पोदी क्रमांक २ कातकरीवाडी आदिवासीवाडी, कुष्ठरुग्ण वसाहतीमधील बंधू भगिनींना फळे वाटप करण्यात आली.

पनवेल शहर मंडल महिला मोर्चाच्या अध्यक्षा वर्षा नाईक, माजी नगरसेविका नीता माळी, शहर मंडल वैद्यकीय सेलच्या संयोजिका ज्योती देशमाने, अशोक आंबेकर, महिला मोर्चा सदस्या मयुरी उनडकर, शैला आंबेकर यांच्या हस्ते सामाजिक अंतराचे नियम पाळून हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

कळंबोलीतील दुरावस्थेतील रस्त्यांची सिडकोकडून डागडुजी

सेक्टर १४ आणि १५ मधील खड्डे बुजवण्यात सुरुवात

दै.रायगड नगरी । पनवेल

कळंबोली वसाहतीतील प्रभाग क्रमांक सात मधील सेक्टर १४ आणि १५ येथील रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे. रस्ते खड्ड्यात की खड्डे रस्त्यात अशी परिस्थिती येथे असल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. दरम्यान यासंदर्भात स्थानिक नगरसेवक राजेंद्र शर्मा, अमर पाटील, प्रमिला रविनाथ पाटील यांनी पाठपुरावा केला होता. त्याची दखल घेत सिडकोने खड्डे बुजवण्यात सुरुवात केली आहे. त्यामुळे तात्पुरता दिलासा येथील नागरिकांना मिळणार आहे.

सेक्टर १४ आणि १५ या परिसरात बी यु डीपी योजनेअंतर्गतील घरे आहेत. याठिकाणी लोकवस्ती ही मोठी आहे. समोर ४०, ६०, १०० आणि १२० मीटरच्या प्लॉटवर रो हाऊस आहेत. दरम्यान गेल्या काही वर्षांपासून येथील अंतर्गत रस्त्यांकडे दुर्लक्ष केले गेले. त्याचबरोबर नालेसफाई ही केवळ वरवर केले जाते. परिणामी पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. जास्त पावसात गुडघ्यापर्यंत पाणी साचून जनजीवन विस्कळीत होते. कायम पाणी रस्त्यावर राहिल्याने ठीक ठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. एकाही रस्त्यांवर डांबर सुद्धा शिल्लक दिसत नाही. अक्षरशा चाळण झाल्याने वाहने चालवता येत नाहीत. गटारांची झाकणे उघडे असल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाली

आहे. महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर सिडको प्राधिकरणाने या परिसरात ढुंकूनही पाहिले नाही. त्यामुळे अंतर्गत रोडची अवस्था ग्रामीण भागातील रस्त्यांची पेक्षाही बिकट झालेली आहे. त्यामुळे स्थानिक रहिवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात नगरसेवक राजेंद्र शर्मा त्यांनी वारंवार सिडकोकडे पाठपुरावा केला. पत्रप्रपंच करून सिडकोच्या अधिकार्यांना पाहणी करण्यासाठी पाचारण केले. येथील विदारक स्थिती यांच्या निदर्शनास आणून दिली. त्याचबरोबर नगरसेविका प्रमिला रवीनाथ पाटील, स्थायी समितीचे माजी सभापती अमर पाटील, भाजपाचे कळंबोली मंडल अध्यक्ष रवीनाथ पाटील यांनीही सिडकोच्या संबंधित अधिकार्यांना अल्टिमेटम दिले. संबंधित रस्त्यांची झालेली दुरावस्था लक्षात आणून दिली. दरम्यान सिडकोने या रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम बुधवारपासून हाती घेतले आहे. त्याचबरोबर पावसाळी नाल्यांची मधील मातीही काढण्यात येत आहे. परिणामी स्थानिक रहिवाशांचा त्रास काही दिवस का होईना कमी होणार आहे.

> प्रभाग क्रमांक सात मधील सेक्टर १४ आणि १५ येथील रस्त्यांबाबत आम्ही स्थानिक नगरसेवक म्हणून सातत्याने पत्रप्रपंच केला. याबाबत सिडकोच्या अधिकार्यांच्या भेटी घेतल्या. त्यांना त्या ठिकाणी घेऊन जाऊन प्रत्यक्ष वस्तुस्थिती दाखवली. त्या पार्श्वभूमीवर सिडकोने डागडुजीचे काम हाती घेतले आहे. या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी आम्ही सिडकोकडे केली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनानुसार पाठपुरावा सुरू आहे. पावसाळ्यानंतर हे सर्व रस्ते चांगले होतील.
>
> **राजेंद्र शर्मा**
> **नगरसेवक पनवेल महापालिका**

जिवंत विद्युत वाहिनी तुटून पडल्याने तीन म्हशी व गायींचा जागीच मृत्यू

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

सुधागड तालुक्यातील होतोंड ग्रामपंचायत हद्दीतील गोंदाव येथे जिवंत विद्युत वाहिन्या शुक्रवारी दि.(१८)सकाळी सहा वाजता तुटून चरण्यासाठी गेलेल्या गुरांवर कोसळल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत येथील शेतकरी एकनाथ परशुराम पाठारे यांच्या तीन म्हशी व एक गाय जागीच ठार झाली आहे. सुदैवाने या दुर्घटनेत मनुष्यहानी टळली आहे. या घटनेची एकनाथ पाठारे यांनी विजवीतरण विभाग व पोलिसांना माहिती दिली. विजवीतरण विभागाने या घटनेचा तात्काळ पंचनामा करून तातडीने शेतकऱ्याला नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. सुधागड तालुक्यात विजवीतरण विभागाचा गलथान कारभार व हलगर्जीपणा सातत्याने समोर आला आहे. अनेक निष्पाप जीवांना आपले प्राण देखील गमवावे लागले आहे. वीज

समस्येबाबत सातत्याने लेखी व तोंडी तक्रारी व मागणी करून देखील पाली सुधागड विजवीतरण विभाग याकडे दुर्लक्ष करीत आला आहे.त्यामुळे अशा जीवघेण्या घटना सातत्याने घडत असल्याचा संताप गोंदाव ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते महादेव पाठारे यांनी या भागातील विजसमस्या सातत्याने विजवीतरण अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या, मात्र याकडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष होत असल्याने अशा दुर्घटना घडतात. विजवीतरण विभागाने येथील समस्या जलदगतीने सोडवाव्यात अन्यथा ग्रामस्त आंदोलनाचा पावित्रा घेतील असा इशारा पाठारे यांनी दिला आहे. सम्यक क्रांती विचारमंचाचे अध्यक्ष, तथा होतोंड ग्रामस्त मंगेशभाऊ वाघमारे यांनी गोंदाव व आदिवासींवाडीकडे जाणारे अनेक विद्युत खांब जुने व जर्जर झालेले असून धोकादायक स्थितित आहेत. शिवाय विद्युत वाहिन्या देखील लोम्बकळत असून कधीही तुटून जीवितहानी होण्याची दाट भीती आहे.

करचुंडे आदिवासींवाडीत जिवंत विजेच्या तारा तुटून अंगावर पडल्याने दोन लहान बालकांचा मृत्यू झाला होता, याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी विजवीतरण विभागाने अधिक दक्षता घेत होतोंड ग्रामपंचायत हद्दीतील धोकादायक विजेचे खांब बदलावेत, व विद्युत तारांची देखभाल देखभाल दुरुस्ती करावी अशी मागणी वाघमारे यांनी केली आहे. विजवीतरण विभागाने या ज्वलंत व अत्यावश्यक मागणीकडे दुर्लक्ष केल्यास पुढे होणाऱ्या दुर्घटनांना अधिकारी व कर्मचारी हे जबाबदार राहतील असा इशारा गोंडाव ग्रामस्थांनी दिला आहे.

लॉकडाऊनमधे सुद्धा न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेची घोडदौड कायम

दै.रायगड नगरी । पनवेल

लॉकडाऊनच्या काळात जिथे कामगारांना नोकरी टिकविणे व पगार मिळणे जिकरीचे झाले असताना अशा बिकट परीस्थीतीत फक्त महेंद्र घरत यांची न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनाच कामगारांना न्याय देवू शकते असा विश्वास कामगारांमध्ये निर्माण झालेला आहे.त्यामुळे लॉकडाऊनच्या काळात सुद्धा न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेकडे कामगारांचा ओघ सुरू आहे.

जे. डब्लू. आर, पंजाब कॉनवेअर, ओल्ड मर्स्क, सी. डब्लू. सी, इम्पेक्स पार्क, बि.एम.सी.टी, कायम स्वरूपी कामगार, जी.टी.आय मधील पिनाकल मरीन, बी.सि.एल, युचर्झ, शुभम एच पी द्रोणागिरी या अस्थापनांतील पाचशेहून अधिक कामगारांनी मागील पाच महिन्यात कामगार नेते महेंद्र घरत यांचे नेतृत्व स्विकारले आहे.

राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे प्रश्न मांडून त्यांना न्याय देण्यात न्यु मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटना यशस्वी होत आहे. संघटनेच्या नामफलक अनावरणाचा धडाका कामय आहे.

सिंगापूर पोर्ट नंतर जी.टी.आय मधील बी.सि.एल, पिनाकल व युचर्झ या कंत्राटाअंतर्गत काम करणाऱ्या कामगारांनी कामगार नेते महेंद्र घरत यांचे नेतृत्व स्विकारले आहे. संघटनेच्या नामफलकाचे अनावरण महेंद्र घरत यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या प्रसंगी संघटनेचे कार्याध्यक्ष पि.के. रामण, सरचिटणीस वैभव पाटील उपाध्यक्ष किरीट पाटील, विनोद म्हात्रे, संजय ठाकूर, संघटक रोहित घरत, आदीनाथ भोईर, प्रेमनाथ ठाकूर, अंगद ठाकूर, चंद्रकांत ठाकूर, प्रांजल भोईर, राजेंद्र भगत, विवेक म्हात्रे, आदीत्य घरत, हितेन घरत, अरूण म्हात्रे, अमोल ठाकूर, प्रसाद पाटील, आंनद ठाकूर व जी.टी.आय चे कामगार उपस्थीत होते.

सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार केवल महाडिक यांच्यावर राजे प्रतिष्ठान कामगार सेनेच्या महाराष्ट्र सहचिटणीसपदी धुरा

दै.रायगड नगरी । पनवेल

गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारितेसह सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे व गेल्या काही वर्षांपासून राजे प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणारे केवल महाडिक यांच्यावर राजे प्रतिष्ठान कामगार सेनेच्या महाराष्ट्र सहचिटणीसपदी धुरा सांभाळण्यास देण्यात आली आहे.

राजे प्रतिष्ठान कामगार सेनेचे धडाडीचे नेतृत्व, व्यक्तिमत्व व तरुणांशी आपुलकीचे नाते जोडणारे केवल महाडिक यांची त्यांनी केलेल्या गेल्या वर्षभरातील कामाची पोचपावती म्हणून आज मा. खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले महाराज यांच्या आदेशाने व संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र खानविलकर उर्फ काकासाहेब व प्रकाशभाई कोळी, चंद्रकांत धडके मामा यांच्या मार्गदर्शनानुसार राजे प्रतिष्ठान कामगार सेनेच्या महाराष्ट्र सहचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

बंदी असतानाही श्रीवर्धन बाजारपेठेत प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास वापर

दै.रायगड नगरी । संतोष चौकर

श्रीवर्धन : प्रदूषणासाठी सर्वात घातक असलेल्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करण्याबाबत राज्य शासनाने आदेश काढून बंदी आणलेली आहे. मागील वर्षी प्रत्येक नगरपालिका हद्दीमध्ये किंवा महानगरपालिका हद्दीमध्ये व्यापारी, भाजी दुकानदार यांच्या दुकानावरती धाड घालून हजारो रुपये किमतीच्या प्लॅस्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या होत्या.

प्लॅस्टिक पिशव्या जप्त केल्यानंतर देखील काही व्यापारी चोरी छुप्या पद्धतीने प्लास्टिक पिशव्यांचा वापर करत असल्याची गोष्ट निदर्शनास आली होती. त्यानंतर प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांवरती निर्बंध आणण्यासाठी भरारी पथकाची नेमणूक देखील करण्यात आली होती. भरारी पथकाकडून व्यापारी,

भाजी दुकानदार तसेच इतर काही छोटे दुकानदार किंवा फळ विक्रेते यांच्याकडे पिशव्या आढळून आल्यानंतर, रुपये पाच हजार, रुपये दहा हजार पर्यंत दनडात्मक कारवाई देखील करण्यात आली होती. त्यानंतर बरेच दिवस प्लास्टिक पिशव्यांचा वापर बंद होता. परंतु लॉकडाऊन नंतर आता सर्रासपणे पिशव्यांचा वापर होताना पाहायला मिळत आहे.

श्रीवर्धन शहरातील व्यापारी त्याचप्रमाणे छोटे दुकानदार, फळविक्रेते, भाजी विक्रेते यांच्याकडून बिनधास्तपणे प्लॅस्टीकच्या पिशव्या ग्राहकांना देण्यात येत आहेत. २० मायक्रोन पेक्षा कमी असलेल्या या पातळ पिशव्या नष्ट होत नाहीत किंवा कुसत देखील नाहीत. त्यामुळे अनेक प्रदूषणाचे मार्ग या प्लास्टिक पिशवी पासून तयार होतात. अनेक वेळा प्लास्टिक पिशव्या गटारांमध्ये अडकल्यामुळे पाणी तुंबण्याचे प्रकार घडतात. पर्यायाने व्यापाऱ्यांचेच नुकसान होते. तरी श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासन प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांवरती कारवाई करेल का? असा प्रश्न पर्यावरणप्रेमी नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.